# भारतीय इतिहासात भटक्या विमुक्तांचे स्थान महत्वाचे : डॉ.नारायण भोसले

कोल्हापूर दि.२३ (प्रतिनिधी)- तीन हजार वर्षांपासूनच्या भटक्या विमुक्त जाती जमातींची इतिहासात नोंद आहे. भारतात १००० पेक्षा जास्त भटक्या विमुक्त जाती असून आजही भटके जीवन जगत आहेत. या जाती जमातींची दीर्घकाळ समृध्द अशी परंपरा असून सुध्दा शासकीय स्तरावर त्यांची कुठेही नोंद आढळून येत नाही. भटक्या विमुक्त जाती जमातींचे साहित्य आजही मौखिक स्वरुपात आढळते. असे प्रतिपादन हिंदी विभाग विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त) चा हिंदी विभाग, खठउ आणि खउढ्ढठ च्या संयुक्त विद्यमाने 'विमुक्त और घुमंतू जन समुदाय : दशा और दिशा' (भारतीय साहित्य के परिप्रेक्ष्य में) या दोन दिवशीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी डॉ. नारायण भोसले यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे हे होते.

अध्यक्षीय मनोगतात संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी भटक्या, विमुक्तांचे इतिहासातील स्थान अधोरेखित करुन शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांनी भटक्या विमुक्त जाती जमातीसाठी व रायगड, जोहा यासारख्या आदिवासी भागात केलेल्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेतला.

कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजन व संस्था प्रार्थनेने करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी




केले. डॉ.आरिफ महात यांनी स्वागत व पाहुण्यांचा परिचय करुन दिला. याप्रसंगी संस्थेच्या सेक्रेटरी मा. प्राचार्या सौ. शुभांगी गावडे यांनी मनोगत व्यक्त केले. या चर्चासत्रातील दुस-या सत्रात श्री सुर्यकांत भिसे, सामाजिक कार्यकर्ते, सोलापूर, डॉ. एन. शांता नाईक, कृष्ण देवरिया विश्वविद्यालय बळ्ळारी, प्रा. डॉ. सुनील बनसोडे, डॉ. रमेशकुमार गवळी यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे आभार चर्चासत्राचे सहसमन्वयक डॉ. दीपक तुपे यांनी मानले तर सुत्रसंचालन प्रा.सुप्रिया पाटील यांनी केले. यावेळी आय.क्यु.ए.सी.च्या समन्वयक डॉ.श्रुती जोशी, बेळगाव, बेल्लारी, सोलापूर, मुंबई, पुणे, कोल्हापूर परिसरातील प्राध्यापक, अभ्यासक, संशोधक मोठया संख्येने उपस्थित होते.

Scanned by CamScanner